# आनंद आणि सुख

आनंद जन्मतो सर्वसामान्यांच्या उदरात
आणि सुख निपजते श्रीमंतीच्या गर्भातून.
गाऊ नाही शकत सुख, जरी बंधमुक्त
आनंद गातो मनसोक्त, अडचणीत असून.

सुख जणु पतंग – झोपून भर दिवसा
आभासी चकचकाटात रात्री नाचणारा.
आनंद मात्र नाजूक, फुलपाखरासारखा
रंगीत पंख पसरून प्रकाशाला दाद देणारा.

आनंद असतो मधमाशीसारखा, जी टिपते
बहरलेल्या फुलांचा मध त्यांच्याही नकळत.
सुख असते डंख मारणाऱ्या माशीसारखे
नाजूक मनुका, करवंद अधाशीपणे गिळत.

आनंद म्हणजे चंडोल स्वमग्न विहरणारा
ज्याची नाती कमी, पण बंध घट्ट असतात.
सुख भटकते दिशाहीन कोकिळेसारखे
जिच्या ओळखी अनेक, मित्र कुणी नसतात.

आनंद स्वगृही अंतःस्फूर्तीने मुक्त गातो
कुणी ऐकते की नाही, त्याला फिकीर नसते.
सुखाचे हृदय शिथील आणि थंडगार असते
ते फक्त अनोळख्यांसमेत हसते खिदळते.

Joy and Pleasure by William Henry Davies
Translation by Abhay B. Joshi and Milind A. Toro